**वॉक इन इंटरव्हयू**

**महाराष्ट्र शासन**

**विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण)**

महाराष्ट्र शासन निर्णय, गृह विभाग क्र.एमआयएस - ३६१४/प्र. क्र. १३/पोल - ३, दिनांक : १०/०९/२०१४ अन्वये प्राधिकरणाचे कार्यालयासाठी कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यात दि. १०/०२/२०१५ च्या समक्रमांच्या शुद्धीपत्रकानुसार उच्चश्रेणी लघुलेखक पदाच्या श्रेणी वेतनात बदल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीई - १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का. १३), दिनांक १० जून २०२५ मधील तरतूदीनुसार खालील नमूद मंजूर पद हे सेवानिवृत्त राजपत्रित वर्ग - ब शासकीय सेवकांमधून कार्यालयाचे विवक्षित कामकाज करणेकामी कमाल एक वर्षाचे कालावधीसाठी करार पध्दतीनुसार भरावयाची आहेत. याच शासन निर्णयाचे परिच्छेद ड) मासिक पारिश्रमिक मधील (क) तसेच त्यास अनुसरून याच शासन निर्णयाचे अखेरीस असलेल्या परिशिष्ट - अ अथवा (ख) मध्ये उध्दृत केल्याप्रमाणे जे लागु असेल त्याप्रमाणे मासिक परिश्रमिकाची व भत्यांची परिगणना करण्यात येईल.

| क्र. | पदनाम | पदसंख्या | जुनी वेतनश्रेणी | ७ व्या वेतन आयोगानुसार नवीन पे मॅट्रीक्स व नवीन वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | उच्चश्रेणी लघुलेखक | ०१ | (९,३००-३४,८०० श्रे. वे. ४,४००) | एस-१५ |

**उच्चश्रेणी लघुलेखक पदासाठी सूचना**

१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीई - १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का. १३), दिनांक १० जून २०२५ मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सबब त्यांनी नमूद शासन निर्णयाचे सूक्ष्म अवलोकन करावे.

२) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येणा-या सेवानिवृत्त अधिकारी यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना, प्रतिज्ञापत्र, अनुभव, वयोमर्यादा, मासिक पारिश्रमिक, भत्ते, कर्तव्य व जबाबदा-या, अटी व शर्ती नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या navimumbaipolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहेत.

३) मुलाखतीच्या दिवशी दिनांक: ०७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वा. इच्छुक उमेदवाराने खालील कागदपत्रांसह वॉक – इन - इंटरव्हयुसाठी पहिला मजला, पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई, भारतीय रिझर्व बॅंकेसमोर, सेक्टर १०, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ येथे स्वखर्चाने उपस्थित रहावे.

पोलीस आयुक्त, नवी मुंबई
तथा विभाग प्रमुख,
विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण,
नवीमुंबई (कोंकण) यांचे मान्यतेने.

स्वाक्षरित

(विशाल ठाकुर)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, नवी मुंबई
तथा कार्यालय प्रमुख,
विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण,
नवी मुंबई (कोंकण)

विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण) या कार्यालयात प्राधिकरणाच्या कामकाजानुसार महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीई - १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का. १३), दिनांक : १० जून २०२५ मधील सर्व अटी व शर्तींना अधीन राहुन उच्च श्रेणी लघुलेखक म्हणुन प्रत्यक्ष कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असलेले शासकीय व निम शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले गट – ब मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी यांना नमुद पदाच्या विवक्षीत कामाकरीता सेवा करार पद्धतीने घेणेकरीता विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

खालील माहिती सोबत जोडली आहे

१) अर्जाचा नमुना

२) अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

३) (अ) अनुभव व वयोमर्यादा,

(ब) मासिक पारिश्रमिक व भत्ते

(क) कर्तव्ये व जबाबदा-या

(ड) अटी व शर्ती

(इ) आवेदनासोबत जोडावयाचे अभिलेख

४) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीई - १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का. १३), दिनांक : १० जून २०२५ ची प्रत.

उक्त नमुद शासन निर्णयातील तरतुदीनुसार तयार करण्यात येणा-या नामिकासुचीची (Panel) वैधता – सदर नमिकासुचीतील व्यक्तींमधुन करार पद्धतीने नियुक्ती करण्यात येईल. या नामिकासुचीची वैधता कमाल ०३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षीक आढावा घेण्यात येईल.

अर्जाचा नमूना

| कार्यालयीन उपयोगासाठी: | पासपोर्ट साईज फोटो |
|---|---|
| १) अर्ज क्रमांक : ☐☐☐☐☐☐☐<br>२) अर्ज स्विकारल्याचा दिनांक ☐☐☐☐☐☐☐☐<br>३) अर्ज स्विकारणा-याची स्वाक्षरी, दिनांकासह...................................................... | |

सूचना:- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

अर्जदाराची वैयक्तीक माहिती :-

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव : आडनाव नाव वडिलांचे/पतीचे नाव

मराठीत :-...................................................................................................................................

इंग्रजीत :- ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

२. पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता :-

तालुका :- .................................. जिल्हा :-................................. पिन :- ☐☐☐☐☐☐

३. कायमचा पत्ता :- ..........................................................................................................

तालुका :- .................................. जिल्हा :-................................. पिन :- ☐☐☐☐☐☐

४. दूरध्वनी क्रमांक : लँडलाईन .................................... मोबाईल क्रमांक : ....................................

५. ई – मेल :- ..........................................................................................................................

६. जन्म दिनांक :- ☐☐☐☐☐☐☐☐ (प्रमाणपत्र सोबत जोडावे)

७. लिंग: पुरूष ☐ महिला ☐

८. शैक्षणीक अर्हता

| शिक्षण | शैक्षणीक संस्थेचे नाव (विद्यालय/महाविद्यालय) | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी | प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | | | | | | प्रमाणपत्र सोबत जोडावे |

९. प्रशासकीय अधिकारी अथवा उच्च श्रेणी लघुलेखक या अर्ज केलेल्या कामाचा अनुभव असलेलेया पदासाठी तपशील: संपूर्ण सेवा तपशील (पुष्ठ्यर्थ कागदपत्रे जोडावीत)

| क्र. | पद | नेमणूक | कालावधी |
|---|---|---|---|
| १) | | | |

१०.इतर शैक्षणीक अर्हता :
संगणक प्रशिक्षित आहे काय ? होय ☐ नाही

११.अर्जदार म्हणजे करार पध्दतीने नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणत्याही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित आहे अथवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली आहे काय ?
होय ☐ नाही ☐

१२.सध्या मिळत असलेले एकूण सेवानिवृत्ती वेतन:- निवृत्तीवेतन आदेशाची प्रत जोडावी.

अर्जदाराची सही

(२)

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी. श्री./ सौ./ श्रीमती.........................................................................................

याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो/करते की, माझे आवेदन अर्जात मी दिलेली माहिती जाणीवपूर्वक तसेच, विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर अथवा नियुक्ती झाल्यानंतर माझी निवड/ नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच, मी निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन. मला असेही ज्ञात आहे की, ही नेमणूक फक्त/निव्वळ करार पध्दतीवर आहे व याबाबत माझा कोणताही नोकरी विषयक दावा व धारनाधिकार राहणार नाही. याबाबत उद्भवणारे कोणतेही वादावर मी कोणत्याही कोर्टात दाद मागू शकणार नाही व पोलीस आयुक्त, नवी मुंबई तथा विभाग प्रमुख, विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण विभाग) यांचा निर्णय अंतिम राहील.

ठिकाण:

दिनांकः

अर्जदाराची सही

अ) **अर्हता, अनुभव व वयोमर्यादा :-**

अर्हता व अनुभव:-

i) उच्च श्रेणी लघुलेखक म्हणुन काम केल्याचा किमान ०३ वर्षांचा अनुभव असलेले सेवानिवृत्त गट – ब अधिकारी.

ii) सेवाकरार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता व गुणवत्ता असावी.

iii)करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरूध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

वयोमर्यादा:- करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या व्यक्ती केवळ वयाच्या ६५व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

(ब) **मासिक पारिश्रमिक व भत्ते :**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीबीई - १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का. १३), दिनांक : १० जून २०२५ मधील मधीलपरिच्छेद ड) मासिक पारिश्रमिक खालील (क) तसेच त्यास अनुसरून याच शासन निर्णयाचे अखेरीस असलेल्या परिशिष्ट - अ अथवा (ख) मध्ये उध्दृत केल्याप्रमाणे जे लागु असेल त्याप्रमाणे मासिक परिश्रमिकाची व भत्यांची परिगणना करण्यात येईल.

**(क) कर्तव्य व जबाबदा-या :-**

उच्च श्रेणी लघुलेखक म्हणुन कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त गट – ब मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी :- महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार - ब/ऑगस्ट१०, २०१८/श्रावण१९, १९४० प्रमाणे अधिसूचीत Maharashtra Divisional Level Police Complaint Authority (Administration and Procedure) Regulation, 2018 प्रमाणे विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, नवी मुंबई (कोंकण), पहिला मजला, एम.टी.एन.एल., टेलिफोन एक्सचेंज, प्लॉटनं.७ब, सेक्टर-२१, खारघर, नवी मुंबई स्थित कार्यालय येथे व प्राधिकरणाशी संबंधित विवक्षित कामे करण्याचे कर्तव्य व जबाबदा-या राहतील.

( ड ) अटी व शर्ती:-

१) सदर कामासाठी सेवा करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल, परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी

कामाच्या मुल्यमापनानुसार नूतनीकरण करता येऊ शकेल मात्र, एकुण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

२) सेवाकरार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या विरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी

३) सेवाकरार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे, धारणाधिकार इतर कोणतेही लाभ मिळण्याचाअधिकार/हक्क नसेल.

४) सेवाकरार पद्धतीने नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी यांचे करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार असतील.

५) सेवाकरार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

६) सेवाकरार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

७) सेवाकरार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे, माहिती व आधार सामुग्री बाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८) सेवाकरार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चीत केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेवून कामाचे मूलयमापन करतील.

९) सेवाकरार पध्दीतीने नियुक्त करण्यात येणा-या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार नसतील.

(इ) आवेदनासोबत जोडावयाचे अभिलेख:-

१. निवृत्तीवेतनाच्या आदेशाची सत्यप्रत.

२. अलीकडचा रंगीत पासपोर्ट साईज फोटो (चार प्रती).

३. सेवानिवृत्तीपूर्व लगतचे मागील ५ वर्षांचे गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती.

४. सेवानिवृत्तीनंतर सेवाकरारावर काम केले असल्यास त्याबाबतची कागदपत्रे व अनुभव प्रमाणपत्र.

५. सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची साक्षांकित फोटोप्रत.

६. सेवेत असताना विभागीय चौकशी सुरू अथवा प्रस्तावित नाही तसेच अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नाही याबाबतचे स्वयंघोषणापत्र,

७. नियुक्ती नंतर सेवा करण्यास शारीरिक दृष्ट्यापात्र असल्याचे स्थानिक डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र,

८. कोणताही फौजदारी गुन्हा दाखल अथवा प्रलंबीत नसल्याबाबत स्वयंघोशणापत्र.

**शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीबीई १५२५ /प्र.क्र. ३७/आस्थामं (का.१३)**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० जून, २०२५.

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : संकीर्ण -२७१५/प्र.क्र. १००/१३, दिनांक १७ डिसेंबर २०१६.

२) शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : संकीर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक २१ फेब्रुवारी २०१८.

३) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : संकीर्ण -२७१५/प्र.क्रं. १००(भाग-१)/१३, दिनांक १४ जुलै २०२१.

४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : संकीर्ण -२७१५/प्र.क्रं. १००(भाग-१)/१३, दिनांक ८ सप्टेंबर २०२३.

५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : संकीर्ण -२७१५/प्र.क्रं. १००(भाग-१)/ आस्थामं (कार्या.१३), दिनांक २३ सप्टेंबर २०२४.

<u>प्रस्तावना:-</u>

शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत संदर्भांकित क्रमांक १ येथील शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीत वेळोवळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ व त्यानंतर करण्यात आलेल्या सुधारणांचा एकत्रित विचार करुन शासन सेवेतील शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत सर्वसमावेशक एकत्रित सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

सामान्य प्रशासन विभागाचे दि. १७.१२.२०१६, दि.२१.०२.२०१८, दि. १४.०७.२०२१, दि. ०८.०९.२०२३ व दि. २३.०९.२०२४ हे शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत. शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा विषयनिहाय एमपॅनलमेंट (empanelment) करुन, विवक्षित कामासाठी करार पध्दतीने उपलब्ध करुन घेता येतील. त्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती विहित करण्यात येत आहे.

**अ) निवडप्रक्रिया व नियुक्ती -**

१) **नामिकासूची (Panel)** - करार पद्धतीने "विवक्षित कामासाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहित पध्दतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहिरातीमध्ये नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तींची संख्या, विवक्षित कामाचे स्वरुप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक याचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवारांची निवड करुन नामिकासूची (panel) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी.

२) **नामिकासूचीची (Panel) वैधता**- सदर नामिकासूचीतील व्यक्तिंमधूनच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३) **एमपॅनलमेंटचा कालावधी** -विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित करावा.

४) **बंधपत्र/हमीपत्र** - नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्यांकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पद्धतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

५) **नियुक्ती आदेश** - नामिकासूचीतील व्यक्तीकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशांमध्ये "एमपॅनलमेंटचा विषय", "विवक्षित स्वरुपाचे काम" आणि ते काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करुन सक्षम प्राधिकारी यांनी नियुक्ती आदेश काढावेत.

६) **करार पद्धतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तिंची संख्या** - करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील/आस्थापनेवरील एकूण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १०% इतक्या अधिकाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देता येईल. करार पद्धतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरुप, आकस्मिकता, सार्वजनिक हित इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात.

७) **करार पद्धतीने नियुक्तीची कालमर्यादा** - सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार

वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक असणार नाही.

८) **वयोमर्यादा** - करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

९) **सक्षम प्राधिकारी** -

(१) गट-अ (वेतनस्तर एस- २५ किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास असतील.

(२) गट-अ (वेतनस्तर एस- २५ पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९(२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.

(३) गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार प्रादेशिक प्रमुखांना (Regional Heads) असतील.

(४) **गट-क व गट-ड संवर्गातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येऊ नये.**

**ब) अर्हता व अनुभव -**

१) विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्व अट ठेवण्यात यावी.

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**क) नियमित मंजूर पदे**

१) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार (Contractual) पद्धतीने करण्यात येणारी नियुक्ती ही नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच करण्यात यावी.

२) नियमित मंजूर पदांवर (Sanctioned Posts) करार पद्धतीने नियुक्ती करता येणार नाही, अशी पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात यावीत.

३) करार पद्धतीने नियुक्तीमुळे शासन सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**ड) मासिक पारिश्रमिक व भत्ते -**

**१) मासिक पारिश्रमिक**

**(क) शासकीय/निमशासकीय सेवा-** सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन करार पध्दतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी मिळत असलेले मुळ निवृत्तीवेतन (अंशराशीकरण मुल्य विचारात न घेता) व त्यावरील महागाई भत्त्यासह मिळणाऱ्या रकमेएवढी रक्कम त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

(मासिक पारिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण **परिशिष्ट-अ** येथे उद्धृत करण्यात आले आहे.)

**ख) निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा** - ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पद्धतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम **केवळ हिशेबासाठी** परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

**२) भत्ते** - उक्त तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५%" इतक्या मर्यादेपर्यंत एकत्रित रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

(मासिक पारिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण या शासन निर्णया सोबतच्या "परिशिष्ट-अ" येथे उद्धृत करण्यात आले आहे.)

**३) प्रवासभत्ता व दैनिक भत्ता** - करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

४) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अशा व्यक्तींना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिच्या पारिश्रमिकापोटी व भत्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या "१० कंत्राटी सेवा" या “उध्दिष्ट शिर्षा”तून भागविण्यात यावा.

**इ) इतर अटी व शर्ती**

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळावेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

२. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

३. करार पध्दतीने नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

४. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये.

५. हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू राहील. तथापि, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यासारखी प्राधिकरणे व तत्सम स्वायत्त संस्था तसेच शासनाकडून वेतनासाठी अनुदान प्राप्त न होणारे स्वायत्त शासकीय उपक्रम, नागरी संस्था, मंडळे, महामंडळे तसेच स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत विशेष उध्दिष्ट वाहन (special purpose vehicle) यांना या शासन निर्णयाच्या तरतुदी लागू राहणार नाहीत. उक्त नमूद प्राधिकरणे/संस्थांबाबत सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीने नियुक्त्या करावयाच्या असतील तर त्यांच्या देय असलेल्या वेतन व भत्त्यांबाबत तसेच त्यांच्या प्रशासकीय व वित्तीय अधिकारांबाबत संबंधित प्राधिकरणे/ संस्था योग्य तो निर्णय घेतील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२५०६१०१२५३३५९१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.06.10 12:55:45 +05'30'

**(सु. मो. महाडिक)**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव. राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०.मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
११.सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१२.मा. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य.
१३.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

१४.प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१५.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
१६.महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१७.महालेखापाल (लेखा व अनुज्ञयेता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा,मुंबई.
१९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई.
२०.प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय,
२१.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२२.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२३.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
२४.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई
२५.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई
२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
२७.सर्व विभागीय आयुक्त,
२८. सर्व जिल्हाधिकारी,
२९.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३१.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख/प्रादेशिक
३२.प्रमुख.कार्यालय प्रमुख/
३३.सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
३४.मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३५.निवडनस्ती (आस्थामं (का.१३))

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७ /आस्थामं (का. १३), दि.१०.०६.२०२५ सोबतचे**

## परिशिष्ट-अ

### मासिक पारिश्रमिकाची व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे उदाहरण

| मुद्दा | उदा. क्र. १ |
|---|---|
| निवृत्तीचा दिनांक | दि. ३१.०५.२०२० |
| सेवानिवृत्तीच्या दिनांकास निश्चित झालेले मूळ निवृत्तीवेतन | रु. ४८,२००/- |
| करार पध्दतीने नियुक्तीचा दिनांक | दि. १५.१०.२०२२ |
| करार पध्दतीने नियुक्ती वेळी देय असलेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम | रु. ४८,२००/- |
| करार पध्दतीने नियुक्तीच्यावेळी प्राप्त होणाऱ्या मुळ निवृत्तीवेतनाची रक्कम + महागाई भत्ता | रु. ४८,२००/- + रु. १६,३८८ (माहे ऑक्टोबर, २०२२ @ ३४%) एकूण रु. ६४,५८८ |
| मासिक पारिश्रमिकाची रक्कम (शासकीय सेवा व निमशासकीय सेवा) | रु. ६४,६०० { शंभरात रुपांतरीत } |
| "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह कमाल अनुज्ञेय रक्कम (मासिक पारिश्रमिकाच्या २५%) | रु. १६,१५०* *जास्तीत जास्त |
| एकूण | रु. ८०,७५०* *जास्तीत जास्त |

*****

राज्य सुरक्षा आयोग व पोलीस तक्रार प्राधिकरणांसाठी पदनिर्मिती...

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एमआयएस-३६१४/प्र.क्र.१३/पोल-३

मंत्रालय, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१, कफ परेड, मुंबई-४०० ००५

तारीख: १० सप्टेंबर २०१४

**प्रस्तावना**

मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हिल) क्रमांक-३१०/१९९६ मध्ये दिनांक २२ सप्टेंबर २००६ रोजी दिलेल्या निदेशाची तरतूद महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मध्ये करण्याकरिता मंत्रिमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशींवर मंत्रिमंडळाने दिनांक १५ जानेवारी २०१४ रोजी निर्णय घेतला आहे. मंत्रिमंडळ निर्णयानुसार राज्य सुरक्षा आयोग, पोलीस आस्थापना मंडळे, पोलीस तक्रार प्राधिकरणांची स्थापना तसेच इतर निदेशांची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस (सुधारणा आणि पुढे चालु ठेवणे) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा अधिनियम क्रमांक-२४ ) दिनांक १ फेब्रुवारी २०१४ पासून अंमलात आला आहे.

राज्य सुरक्षा आयोग, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण व विभागस्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरणांसाठी अनुक्रमे ७, २५ व १०१ अशी एकूण १३३ नियमित पदे तसेच अनुक्रमे २, ५ व २४ अशी एकूण ३१ पदे बाहययंत्रणेद्वारे निर्माण करण्यास व त्यावरील आवर्ती रु.३८४.३३ लक्ष आणि अनावर्ती रु.२५३.५७ लक्ष अशा एकूण रु.६३७.९० लक्ष एवढया खर्चास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार राज्य सुरक्षा आयोग, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण व विभागस्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरणांसाठी पदनिर्मिती करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय**

राज्य मंत्रिमंडळाने दिनांक १५ जानेवारी २०१४ च्या बैठकीमध्ये मान्यता दिल्यानुसार, राज्य सुरक्षा आयोग, राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण व विभागस्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरणांसाठी खालीलप्रमाणे पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**१) राज्य सुरक्षा आयोग -**

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय अधिकारी | १ | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,४०० |
| २ | निम्नश्रेणी लघुलेखक | १ | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,३०० |

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| ३ | वरिष्ठ लिपीक | १ | ५,२००-२०,२०० + श्रे.वे. २,४०० |
| ४ | लिपीक टंकलेखक | २ | ५,२००-२०,२०० + श्रे.वे. १,९०० |
| ५ | शिपाई (बाहय यंत्रणेद्वारे) | २ | ४,४४०- ७,४४० + श्रे.वे. १,३०० |
| -- | एकूण ... | ७<br>(५ नियमित + २ बाहय यंत्रणेद्वारे) | -- |

२) राज्य पोलीस तक्रार प्राधिकरण -

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी | १ | १५,६००-३९,१०० + श्रे.वे. ५,४०० |
| २ | प्रशासकीय अधिकारी | १ | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,४०० |
| ३ | गुन्हे अन्वेषण, गुप्तवार्ता दक्षता, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व राज्य मानवी हक्क आयोगामधील कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी | ६ | अंतिम वेतन वजा पेन्शन सुत्राप्रमाणे |
| ४ | अधिक्षक | १ | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,३०० |
| ५ | उच्चश्रेणी लघुलेखक | १ | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,८०० |
| ६ | निम्नश्रेणी लघुलेखक | १ | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,३०० |
| ७ | वरिष्ठ लिपीक | ६ | ५,२००-२०,२०० + श्रे.वे. २,४०० |
| ८ | लिपीक-टंकलेखक | ३ | ५,२००-२०,२०० + श्रे.वे. १,९०० |
| ९ | वाहन चालक | १ (बाहय यंत्रणेद्वारे) | ५,२००-२०२०० + श्रे.वे. १,९०० |
| १० | शिपाई | ४ (बाहय यंत्रणेद्वारे) | ४,४४०-७,४४० + वे.श्रे. १,३०० |
| -- | एकूण ... | २५<br>( २० नियमित +<br>५ बाहय यंत्रणेद्वारे ) | -- |

### ३) विभाग स्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरण -

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय अधिकारी | ६<br>(प्रत्येक विभागासाठी एक) | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,४०० |
| २ | गुन्हे अन्वेषणाच्या कामाचा अनुभव असलेले सेवानिवृत्त राजपत्रित पोलीस अधिकारी | ३५<br>(प्रत्येक जिल्हयासाठी एक) | अंतिम वेतन वजा पेन्शन सुत्राप्रमाणे |
| ३ | अधिक्षक | ६<br>(प्रत्येक विभागासाठी एक) | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,३०० |
| ४ | उच्चश्रेणी लघुलेखक | ६<br>(प्रत्येक विभागासाठी एक) | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,८०० |
| ५ | निम्नश्रेणी लघुलेखक | ६<br>(प्रत्येक विभागासाठी एक) | ९,३००-३४,८०० + श्रे.वे. ४,३०० |
| ६ | वरिष्ठ लिपीक | ६<br>(प्रत्येक विभागासाठी एक) | ५,२००-२०,२०० + श्रे.वे. २,४०० |
| ७ | लिपीक-टंकलेखक | १२<br>(प्रत्येक विभागासाठी दोन) | ५,२००-२०,२०० + श्रे.वे. १,९०० |
| ८ | वाहन चालक | ६<br>( प्रत्येक विभागासाठी एक - बाहय यंत्रणेद्वारे) | ५,२००-२०,२०० + श्रे.वे. १,९०० |
| ९ | शिपाई | १८<br>( प्रत्येक विभागासाठी तीन - बाहय यंत्रणेद्वारे) | ४,४४०-७,४४० + वे.श्रे. १,३०० |
| -- | एकूण ... | **१०१**<br>(७७ नियमित + २४ बाहय यंत्रणेद्वारे) | -- |

२. प्रस्तुत कार्यालयांसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष निर्माण करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौचारिक संदर्भ क्रमांक-१९७०/व्यय-१२, दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार तसेच मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०९१०१४५०२४४०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: CN = Charushila Chandrakant Tambekar, C = IN, S = MAHARASHTRA, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HOME
Date: 2014.09.10 15:52:10 +05'30'

**चारुशीला तांबेकर**
शासनाच्या सहसचिव

प्रत,

१. अपर मुख्य सचिव , गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
६. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई,
७. सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
९. सर्व विशेष पोलीस महनिरिक्षक,महाराष्ट्र राज्य,
१०. मंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव,
११. राज्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव,
१२. सर्व पोलीस उप महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य,
१३. सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य,
१४. सर्व पोलीस प्रशिक्षण विद्यालये, महाराष्ट्र राज्य,
१५. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य,
१६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा वअनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), मुंबई/ नागपूर,
१७. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

राज्य सुरक्षा आयोग व पोलीस तक्रार प्राधिकरणांसाठी पदनिर्मिती...

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

### शासन शुद्धीपत्रक क्रमांकः एमआयएस-३६१४/प्र.क्र.१३/पोल-३

मंत्रालय, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१, कफ परेड, मुंबई-४०० ००५

दिनांक : १० फेब्रुवारी २०१५

वाचा

शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक-एमआयएस-३६१४/प्र.क्र.१३/पोल-३, दि. १० सप्टेंबर २०१४

शासन शुद्धीपत्रक

गृह विभागाच्या संदर्भाधीन दिनांक १० सप्टेंबर २०१४ च्या शासन निर्णयातील प्रस्तावनेमधील परिच्छेद-२ मधील ओळ क्रमांक-२ येथील "७, २५, १०१ अशी एकूण १३३ नियमित पदे" ऐवजी **"५, २०, ७७ अशी एकूण १०२ नियमित पदे"** असे वाचावे.

तसेच शासन निर्णयातील परिच्छेद-१ (२) च्या तक्त्यातील अ.क्र.५ आणि परिच्छेद-१(३) च्या तक्त्यातील अ.क्र.४ येथील उच्चश्रेणी लघुलेखकासमोरील स्तंभ-४ मधील वेतनश्रेणी "९३००-३४८०० + श्रे.वे.४८००" ऐवजी **"९३००-३४८०० + श्रे.वे.४४००"** असे वाचावे.

तसेच शासन निर्णयातील परिच्छेद-३ मधील ओळ क्रमांक-१ येथील "वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-१९७०/व्यय-१२, दिनांक १९ ऑक्टोबर २०१३ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार" ऐवजी **"वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार"** असे वाचावे.

२. गृह विभागाच्या दिनांक १० सप्टेंबर २०१४ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आलेली १०२ नियमित पदे व बाहययंत्रणेव्दारे ३१ पदे मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या आस्थापनेवर (गृह विभागाच्या) निर्माण करण्यात आली आहेत.

३. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२१०१४००१७००२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: CN = KADAM DATTATRAY HANMANT, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HOME DEPT,CID - 918120
Date: 2015.02.10 14:46:29 +05'30'

**द.ह.कदम**
कार्यासन अधिकारी, गृह विभाग.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव , गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई.
८. समादेशक, गृहरक्षक व नागरी संरक्षण दल, मुंबई.
९. महासंचालक व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
१०. सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व पोलीस आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व विशेष पोलीस महनिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.
१३. सर्व पोलीस उप महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व पोलीस अधिक्षक, महाराष्ट्र राज्य.
१५. सर्व पोलीस प्रशिक्षण विद्यालये, महाराष्ट्र राज्य.
१६. सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य.
१७. महालेखापाल (लेखा वअनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ / २, मुंबई/ नागपूर.
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.